२५८ २६६ २।६।८
सांकेताक 2017062322

९२८

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख, म.राज्य पुणे यांचे कार्यालय
क्रमांक /एकत्री/अधिकार अभिलेख/२०१७
पुणे दिनांक /०६/२०१७

**परिपत्रक :-**

विषय — जमीन एकत्रीकरण योजना

जमीन एकत्रीकरण योजनेचे काम पुर्ण झाल्यानंतर होणा-या शुध्दीपत्रके व दुरुस्ती योजनांचा अंमल फेरफार नोंदीने अधिकार अभिलेखात घेण्याचे अधिकार भूमापन अधिकारी (एकत्रीकरण अधिकारी) यांना नसल्याने तशी कार्यवाही जर काही भूमापन अधिकारी करीत असतील तर ती प्रथा बंद करणेबाबत

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ या कायदयाच्या कलम ३१ अ अन्वये जी "शुध्दीपत्रके " मंजूर होतात तसेच कलम ३२(१) अन्वये ज्या " दुरुस्ती योजना " मंजूर होतात त्यांचा अंमल अधिकार अभिलेखात फेरफार नोंदीने भूमापन अधिकारी घेत आहेत.

याबाबत उक्त एकत्रिकरण कायदयाच्या कलम २६(१) मधील तरतुदीकडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यामध्ये अशी तरतूद आहे की, " एकत्रीकरणासंबंधीची कामे चालू असताना, एकत्रिकरण अधिका-याने मुंबई जमिन संहिता १८७९ प्रकरण -९, मामलेतदार न्यायालय अधिनियम १९०६ आणि या अन्वये असलेली महसूल अधिका-यांची कामे चालविली पाहिजेत व पार पाडली पाहिजेत.आणि त्यांच्या संबंधात एकत्रिकरण अधिका-याव्यतिरिक्त इतर कोणत्याही महसूल अधिका-याने उक्त अधिनियमान्वये कोणतेही काम चालविता कामा नये."

या तरतूदींचे अवलोकन करता, केवळ जमीन एकत्रीकरण योजनेचे कामकाज, संबंधीत गावी चालू असतानाच भूमापन अधिका-याने ( एकत्रीकरण अधिकारी ) महसूल अधिका-यांची कामे चालविली पाहिजेत व पार पाडली पाहिजेत अशी स्वयंस्पष्ट तरतूद आहे. म्हणजेच संबंधीत गावच्या मंजूर जमीन एकत्रीकरण योजनेनुसार फेरफार नं. १ ने गावच्या अधिकार अभिलेखात ,जमिन एकत्रीकरण योजनेचा अंमल



S-261

घेऊन व ७ x १२ चे प्रख्यापन काम पूर्ण झाल्यानंतर , जमीन एकत्रीकरण योजनेचे दस्तऐवज, अधिकार अभिलेखासह संबंधीत महसुली अधिकारी (गावकामगार तलाठी) यांचेकडे पुढील परिरक्षणासाठी सुपूर्द केले जातात. व त्यापुढील अधिकार अभिलेखाच्या नियमित परिरक्षणाचे काम संबंधीत महसूल अधिकारी यांचे मार्फत केले जाते.

अशा परिस्थितीत जमिन एकत्रीकरण योजनेचे काम संपल्यानंतर एकत्रीकरण कायदयाच्या कलम ३१अ अन्वये मंजूर झालेल्या शुध्दीपत्रक अथवा कलम ३२(१) अन्वये मंजूर झालेल्या दुरुस्ती योजनेचा अंमल संबंधीत गावच्या महसूल अधिकारी ( गावकामगार तलाठी -मंडल निरीक्षक) यांनी घेणे अपेक्षीत आहे. तथापि काही ठिकाणी ही कार्यवाही भूमापन अधिकारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे . ही कार्यवाही चुकीची असून उचित नाही. तसेच ही प्रथा पूर्णपणे बंद होणे आवश्यक आहे. सबब या विषयी सर्व संबंधीत भूमापन अधिकारी यांना अशा सक्त सूचना देण्यात येतात कि, त्यांनी यापुढे " मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ या कायदयाच्या कलम ३१ अ अन्वये मंजूर झालेल्या शुध्दीपत्रकांचा व कलम ३२(१) अन्वये मंजूर झालेल्या दुरुस्ती योजनांचा अंमल अधिकार अभिलेखामध्ये स्वत: फेरफार नोंदीने न घेता अशी 'शुध्दीपत्रके' व 'दुरुस्ती योजना ' संबंधीत महसूल अधिकारी ( गाव कामगार तलाठी ) यांचेकडे अधिकार अभिलेखात नियमानुसार नोंद घेण्यासाठी पाठवावीत.

o/c

dit
23/06/17

(एस. चोक्कलिंगम)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे

प्रत — उपसंचालक भूमि अभिलेख ,(सर्व) --------

प्रत — जिल्हाधिकारी (सर्व ) ------

प्रत — जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख जिल्हा (सर्व) ------------

प्रत — तहसिलदार (सर्व ) ------

प्रत - उप अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व ) ----------



S 262